## eProcurement System Government of Maharashtra

### Tender Details

Date : 02-Aug-2024 01:22 PM

Print

### Basic Details

| | | | |
|---|---|---|---|
| **Organisation Chain** | Director of Technical Education Department Mumbai\|\|Joint Director of Technical Education Pune\|\|Govt. College of Engineering and Research Awasari | | |
| **Tender Reference Number** | GCOEARA/BOYS HOSTEL/2024/2178 | | |
| **Tender ID** | 2024_DTEDM_1063573_1 | **Withdrawal Allowed** | Yes |
| **Tender Type** | Open Tender | **Form of contract** | Lump-sum |
| **Tender Category** | Services | **No. of Covers** | 2 |
| **General Technical Evaluation Allowed** | No | **ItemWise Technical Evaluation Allowed** | No |
| **Payment Mode** | Online | **Is Multi Currency Allowed For BOQ** | No |
| **Is Multi Currency Allowed For Fee** | No | **Allow Two Stage Bidding** | No |

### Payment Instruments

**Online Bankers**

| S.No | Bank Name |
|---|---|
| 1 | SBI Bank |

### Cover Details, No. Of Covers - 2

| Cover No | Cover | Document Type | Description |
|---|---|---|---|
| 1 | Fee/PreQual/Technical | .pdf | Tender Document-Boys Hostel Mess |
| 2 | Finance | .xls | Tender Document (Financial)-Boys Hostel Mess |

### Tender Fee Details, [Total Fee in ₹ * - 5,400]

| | | | |
|---|---|---|---|
| **Tender Fee in ₹** | 5,400 | | |
| **Fee Payable To** | Nil | **Fee Payable At** | Nil |
| **Tender Fee Exemption Allowed** | No | | |

### EMD Fee Details

| | | | |
|---|---|---|---|
| **EMD Amount in ₹** | 90,000 | **EMD Exemption Allowed** | No |
| **EMD Fee Type** | fixed | **EMD Percentage** | NA |
| **EMD Payable To** | Nil | **EMD Payable At** | Nil |

Click to view modification history

### Work /Item(s)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Title** | Boys Hostel Mess | | | | |
| **Work Description** | Tender for Boys Hostel Mess 2024-25 (11 Month Contract) | | | | |
| **Pre Qualification Details** | Please refer Tender documents. | | | | |
| **Independent External Monitor/Remarks** | NA | | | | |
| **Tender Stage to disclose bid details to other bidders/public domain** | Yes | | | | |
| **Tender Value in ₹** | 50,00,000 | **Product Category** | | **Sub category** | NA |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Hotel/ Catering | | |
| **Contract Type** | Tender | **Bid Validity(Days)** | 180 | **Period Of Work(Days)** | 8 |
| **Location** | Govt College of Engg and Res Avasari Kh Pune | **Pincode** | 412405 | **Pre Bid Meeting Place** | Govt College of Engg and Res Avasari Kh Pune |
| **Pre Bid Meeting Address** | Conference Hall, Admin Building, Govt College of Engg and Res Avasari Kh Pune | **Pre Bid Meeting Date** | 08-Aug-2024 03:00 PM | **Bid Opening Place** | Govt College of Engg and Res Avasari Kh Pune |
| **Should Allow NDA Tender** | No | **Allow Preferential Bidder** | No | | |

## Critical Dates

| | | | |
|---|---|---|---|
| **Publish Date** | 02-Aug-2024 01:25 PM | **Bid Opening Date** | 19-Aug-2024 11:00 AM |
| **Document Download / Sale Start Date** | 02-Aug-2024 04:00 PM | **Document Download / Sale End Date** | 16-Aug-2024 05:00 PM |
| **Clarification Start Date** | 02-Aug-2024 04:00 PM | **Clarification End Date** | 16-Aug-2024 04:00 PM |
| **Bid Submission Start Date** | 02-Aug-2024 04:00 PM | **Bid Submission End Date** | 16-Aug-2024 05:00 PM |

## Tender Documents

**NIT Document**

| S.No | Document Name | Description | Document Size (in KB) |
|---|---|---|---|
| 1 | Tendernotice_1.pdf | Tender Document- Boys Hostel Mess | 7809.67 |

**Work Item Documents**

| S.No | Document Type | Document Name | Description | Document Size (in KB) |
|---|---|---|---|---|
| 1 | Tender Documents | BoysHostelFinal.pdf | Tender Document- Boys Hostel Mess | 7792.96 |
| 2 | BOQ | BOQ_1856387.xls | BOQ ( Financial Document) - Tender - Boys Hostel Mess | 277.50 |

## Bid Openers List

| S.No | Bid Opener Login Id | Bid Opener Name | Certificate Name |
|---|---|---|---|
| 1. | nsnehe@gmail.com | Navnath Nehe | NAVNATH SOPANRAO NEHE |
| 2. | principal@gcoeara.ac.in | Dilip Pangavhane | DILIP RAMBHAU PANGAVHANE |
| 3. | sharadkshirsagar@gmail.com | Sharad Kshirsagar | SHARAD VITTHAL KSHIRSAGAR |

## Tender Properties

| | | | |
|---|---|---|---|
| **Auto Tendering Process allowed** | No | **Show Technical bid status** | Yes |
| **Show Finance bid status** | Yes | **Show Bid Details in Public Domain stage** | Technical Bid Opening |
| **BoQ Comparative Chart model** | Normal | **BoQ Compartive chart decimal places** | 2 |
| **BoQ Comparative Chart Rank Type** | L | **Form Based BoQ** | No |

## Tender Inviting Authority

| | |
|---|---|
| **Name** | Principal |
| **Address** | Conference Hall, Admin Building, Govt College of Engg and Res Avasari Kh Pune |

| Tender Creator Details | |
|---|---|
| **Created By** | Dilip Pangavhane |
| **Designation** | Principal |
| **Created Date** | 02-Aug-2024 01:06 PM |

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी (खुर्द)

## ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५

# मुलांच्या वसतिगृह खानावळी करिता निविदा दस्तावेज

## २०२४-२५

महाराष्ट्र शासन
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द
तालुका-आंबेगाव जिल्हा पुणे ४१२४०५
दूरध्वनी क्र. : ०२१३३ २३०५८२ संकेतस्थळ: www.gcoeara.ac.in
ईमेल:office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in
(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)

जावक क्र. शाअवसंमाअ/मुलांचे वसतिगृह/२०२४/ 2968 दिनांक:०२/०८/२०२४

## ई-निविदा सूचना

या महाविद्यालयातील मुलांच्या वसतिगृहातील खानावळ चालविण्याचे काम ई-निविदा मागवून बाह्यस्त्रोताकडून करून घ्यावयाचे आहे. त्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफे पद्धतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेच्या अटी व शर्ती बाबतच्या सूचना निविदेत दिलेल्या आहेत. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १६/०८/२०२४ असा आहे. निविदा प्रपत्र, निविदेत जोडावयाची कागदपत्रे, निविदाकाराणे पाळावयाच्या अटी व शर्ती यांचा तपशील महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.goceara.ac.in व महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. निविदाकारांना निविदा सादर करण्यासंबंधी काही शंका असल्यास त्याचे निराकरण निविदापुर्व बैठकीत करण्यात येईल.

### ई-निविदा संबंधीची महत्वाची माहिती

| अ. क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | ई-निविदा नोटीस प्रसिद्धी | महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in यावर उपलब्ध आहे. |
| २ | कामाचे स्वरूप | शा. अ. व सं. म. अवसरी (खुर्द) येथील मुलांच्या वसतिगृहातील खानावळ ११ महिने कालावधीसाठी चालविणे. |
| ३ | ई-निविदा शुल्क | रुपये ५४००/- ऑनलाईन पद्धतीने संकेत स्थळावर भरण्यात यावे. |
| ४ | बयाना रक्कम | रुपये ९०,०००/- (परतावा योग्य) |
| ५ | संपर्कासाठी पत्ता | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी(खुर्द), तालुका-आंबेगाव , जिल्हा- पुणे-४१२४०५ |
| ६ | दूरध्वनी क्रमांक' | ०२१३३ - २३०५८० |
| ७ | ई-मेल आय. डी. | gcoeara@gmail.com |
| ८ | ई-निविदा संकेतस्थळ | https://www.mahatenders.gov.in |
| ९ | ई-निविदा वैधता | ९० दिवसांकरिता |
| १० | ई-निविदा पूर्व बैठकस्थळ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द), प्रशासकीय इमारतीतील सभागृह |

**महत्वाच्या तारखा**

ई-निविदा भरण्यासंदर्भात महत्वाच्या तारखा खालील तक्त्यात देण्यात येत आहेत. निविदाकाराने सदर तारखांचे तंतोतंत पालन करावे.

| अ.क्र. | कार्य विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशित करणे | दि. ०२.०८.२०२४ (दुपारी ४. ०० वाजता ) |
| २ | संकेतस्थळावर ई-निविदा उपलब्ध करणे | दि. ०२.०८.२०२४ (दुपारी ४. ०० वाजता ) |
| ३ | ई-निविदा सादर करण्याचा सुरवातीचा दिनांक | दि. ०२.०८.२०२४ (दुपारी ४.०० वाजता ) |
| ४ | ई-निविदा पूर्व बैठक दिनांक (इच्छुक निविदाकारांकारिता) | दि. ०८.०८.२०२४ (दुपारी ३.०० वाजता ) |
| ५ | निविदा पूर्व बैठक स्थळ | महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृह |
| ६ | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.१६.०८.२०२४ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत ) |
| ७ | तांत्रिक निविदा छाननी दिनांक | दि.१९.०८.२०२४ (सकाळी ११.०० वाजता ) |
| ८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | दि.२१.०८.२०२४ (सकाळी ११.०० वाजता) |

**सर्व पात्र निविदाकारांनी तांत्रिक व वाणिज्यिक निविदा ऑनलाईन पद्धतीने** www.mahatenders.gov.in **या संकेतस्थळावर सादर करावी. अन्य कोणत्याही पद्धतीने या कार्यालयास सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदाकाराने निविदेसोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडावी. आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नसल्यास निविदा रद्द समजण्यात येईल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहे.**

02-8-24

**डॉ. दिलीप रा. पानगव्हाणे**

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द).

Govt. College of Engineering and Research, Avsari Khurd, Tal. Ambegaon, Dist. (Pune)

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय
अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे.

निविदा पत्रक

**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)**

**मुलांच्या वसतिगृहात कंत्राटी पद्धतीने खानावळ चालवण्याकरिता अटी व शर्ती**

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी(खुर्द) येथील मुलांच्या वसतिगृहात खानावळ चालविणे करिता केटरिंग कंत्राटदार निवडीची प्रक्रिया करण्यात येत आहे. त्या बाबत अटी, शर्ती व प्रपत्र खालील शीर्षकानुसार आहेत:

१.कायदेशीर अटी

२. खानावळ संबंधित अटी

३. खानावळ किचनमध्ये स्वच्छता संबंधित मुद्दे

४. नियमांचे उल्लंघनाबाबत दंड

५. मुलांच्या वसतिगृह खानावळीसाठी मेनूकार्ड.

६. निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

७. निविदा सादर करावयाची पद्धती

८. निविदा उघडण्याची कार्यपद्धती

९. कार्यादेश देण्याची कार्यपद्धती

**प्रपत्र अ** – तांत्रिक निविदेबाबत प्रपत्र (Proforma for theTechnical Bid).

**प्रपत्र ब** – व्यावसायिक निविदेबाबत प्रपत्र (Proformafor the Commercial Bid) (BoQनमुना)

## १. कायदेशीर अटी

१.१ मुलांच्या वसतिगृहातील खानावळ स्वतः न चालविता ती चालविण्यासाठी अन्य व्यक्तीची नेमणूक (Sub-Contracting) करता येणार नाही, तसे आढळून आल्यास कंत्राट रद्द करण्यात येईल.

१.२ कंत्राटदारानी करारातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे करारपत्र रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी समोर करावे लागेल. खानावळीच्या कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करून तक्रारीत तथ्य आढळ्यास करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१.३ खानावळ चालवण्यासाठी एकूण रुपये २,००,००० /- (रु. दोन लाख फक्त) अनामत रक्कम संस्थेत जमा केल्यानंतरच करार अस्तित्वात येईल.

१.४ कराराची मुदत **अकरा महिने** असेल. तथापी खानावळीच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील अकरा महिने मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन

महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील. कराराची मुदत संपल्यानंतर खाणावळीतील सर्व शासकीय साहित्य संस्थेकडे जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच कंत्राटदाराची अनामत रक्कम परत केली जाईल.

१.५ खानावळ चालू केल्यापासून दोन महिन्यांच्या आत संबंधीत कंत्राटदारांनी खानावळीच्या जागेची आरोग्यविषयक तपासणी ग्रामीण आरोग्य विभागाकडून करून घेवून त्या विभागाचा आरोग्यविषयक ना-हरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

१.६ स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर, पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्थेने दिलेली आहेत. त्याचे **भाडे रु. ८५००/- दरमहा** करार सुरु झाल्यापासून करारसंपेपर्यंत (सुट्टीचे दिवस धरून) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे. क्वचित प्रसंगी पाणी, वीजपुरवठा, अपरिहार्य कारणामुळे संस्थेमार्फत पुरवण्यात अडचण निर्माण झाल्यास त्याबाबतची पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल .

१.६ खानावळीसाठी फ्रीज/ फ्रीजरची सुविधा कंत्राटदारांनी स्वतः करावयाची आहे.

१.७ खानावळचालकांनी सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे बंधनकारक आहे व त्यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास व तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधीतावर दंड लावणे/ करार संपुष्टात आणणे यासारखी कारवाई करण्यात येईल. तसेच खानावळीत बालकामगार ठेवता येणार नाहीत.

१.८ खाणावळीतील सर्व विद्युत साहित्याची (उदा. बल्ब, ट्यूब, वायरींग, फॅन इ.) किरकोळ देखभालही केटरिंग कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

१.९ स्वयंपाकघरातील उपकरणे, स्वयंपाक गॅस आणि डायनिंग हॉल, फर्निचर, सर्व्हिस काऊंटर, स्वयंपाक करण्यासाठीची भांडी, इत्यादी संस्थेमार्फत दिलेली आहेत. त्या सर्व वस्तूंची देखभालही कंत्राटदाराची जबाबदारी असेल.

१.१० संस्थेमार्फत खानावळ चालवण्याचा करार आवश्यक वाटल्यास १ (एक) महिन्याची नोटीस देऊन संपुष्टात आणता येईल तसेच खानावळ चालकास करार संपुष्टात येण्यापूर्वीच त्यातून बाहेर पडायचे असल्यास, त्याने संस्थेला ३ (तीन) महिन्याची नोटीस किंवा पुढच्या कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यन्तच्या कालावधी दरम्यान (यापैकी जे आधी घडेल ते ) खानावळ चालवणे बंधनकारक असेल. तसेच ११ महिन्याचा करार संपल्यानंतर आणि सेवा पुरवठादार करार पुढे ११ महिने वाढून मिळण्यास पत्र असेल परंतु पुरवठादार ११ महिने करार वाढून घेण्यास असहमत असेल तर अशा वेळेस पुढच्या कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यन्तच्या कालावधी दरम्यान त्यास आहे त्याच दराने व करारातील आटी व शर्ती नुसार खानावळ चालवणे बंधनकारक असेल.

१.११ खानावळीच्या जागेचा वापर दुसऱ्या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

१.१२ खाणावळीत दोन्ही वेळेला जेवण घेणाऱ्या मुलांची अंदाजे संख्या **२७५ ते ३५०** असेल .

१.१३ खानावाळीमध्ये कोणत्याही कर्मचाऱ्यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

१.१४ कंत्राटदाराने खानावळ कामगारांना किमान आवश्यक त्या औषधासह प्रथमोपचार पेटीची सुविधा प्रदान करणे अनिवार्य आहे.

१.१५ खानावळीची मॅनेजमेंट किंवा तेथील पर्यवेक्षीकाची यादी कंत्राटदाराने वसतीगृह कुलमंत्री यांना देणे आवश्यक राहील.

१.१६ कंत्राटदाराने खानावळीत तक्रार व सूचना नोंदवही ठेवली पाहिजे आणि प्राप्त झालेल्या तक्रारी व सूचना याबाबत वसतीगृह कुलमंत्री यांच्याशी सल्लामसलत करून कार्यवाही करणे बंधनकारक असेल.

१.१७ खानावळ कंत्राटाच्या संपूर्ण कालावधी दरम्यान कंत्राटदारास कोणत्याही कारणास्तव जेवणाचे दर वाढविता येणार नाहीत.

## २. खानावळ संबंधित अटी

२.१ खानावळीसाठी दरमहा जेवणाचे पाच खाडे (गैरहजेरी ) गृहीत धरण्यात येतील.

२.२ विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या पुर्वतयारी कालावधी दरम्यान (preparation leave) व परीक्षेच्या कालावधीमध्ये तसेच सत्र समाप्तीनंतर खानावळीच्या मासिक दराची आकारणी मा. प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२.३ विद्यार्थ्यांकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसुलीची पूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराचीच राहील. त्याकरिता कंत्राटदाराने नगद विरहीत व्यवहाराची (Cashless Transactions) सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

२.४ सर्वसाधारपणे जेवण देण्याची वेळ सकाळी ९.०० ते ११.०० व सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० अशी राहील. तथापि खानावळीची वेळ मा. प्राचार्य, कुलमंत्री व विद्यार्थ्यांच्या एकत्रित चर्चेनुसार बदलता येईल.

२.५ दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मेन्यू कार्ड प्रमाणे जेवण देणे आवश्यक आहे. मेन्यू मध्ये काही कारणाने बदल करणे अपरिहार्य असल्यास त्याबाबत वसतिगृह कुलमंत्र्यांना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.

२.६ संस्थेच्या अधिकृत विद्यार्थ्यांशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देऊ नये अथवा त्यांना डबा देण्याची सुद्धा परवानगी नाही. विद्यार्थ्यांचे पालक किंवा नातेवाईक तसेच परीक्षक /संस्थेतील अधिकारी/ कर्मचारी/ गेस्ट यांना कुलमंत्री यांचे परवानगीने जेवण देता येईल.

२.७ खानावळचालक यांनी अन्नधान्य, किराणा सामानाचा साठा करून ठेवणे आवश्यक राहील. सर्व कच्च्या मालांची सुरक्षित व स्वच्छ पद्धतीने साठवण करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असेल.

२.८ प्रत्येक जेवणानंतर बडीशोप व साखर मिश्रित mouth freshener देणे बंधनकारक असेल.

२.९ उपवासाच्या दिवशी कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय, उपवासाचे पदार्थ देणे बंधनकारक असेल.

२.१० प्रत्येक सणाच्या दिवशी (वर्षात सरासरी २० दिवस) जेवणासोबत गोड पदार्थ देणे बंधनकारक राहील. त्या व्यतिरिक्त प्रत्येक आठवड्यामध्ये मेणुकार्डमध्ये नमूद केल्यानुसार गोड पदार्थ देणे आवश्यक राहील.

२.११ खानावळीत वनस्पती तूप आणि मोनोसोडियम ग्लूटामेट (अजिनोमोटो) चा वापर पूर्णपणे प्रतिबंधित राहील.

२.१२ सर्व टेबलवर सॉल्ट / पेपर डिस्पेंसर उपलब्ध असणे आवश्यक राहील.

२.१३ तयार केलेले अन्न ६ तासांनंतर वापरू नये. तसे निदर्शनास आल्यास ठरविल्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

२.१४ **संस्थेने कंत्राट दिल्यानंतर आणि ते कंत्राटदराने एकदा स्वीकारल्यास त्यानंतर कोणतेही दर वाढून मिळणार नाही तसेच यासंबंधीची दरवाढीबद्दलची कोणतीही तक्रार एकूण घेतली जाणार नाही.**

२.१५ **खानावाळीत विद्यार्थांना दिल्या जाणाऱ्या पदार्थांची गुणवत्ता तपासणी संस्थेच्या समिती मार्फत वेळोवेळी करण्यात येईल.**

## ३. खानावळ किचनमध्ये स्वच्छता संबधित मुद्दे

३.१ खानावळीमध्ये उपलब्ध असणा-या सर्व अन्न पदार्थांचा दर्जा उत्कृष्ट असावा. सर्व अन्नपदार्थ ताजे, गरम व स्वच्छ असावेत.

३.२ जेवण / खाद्यपदार्थांचा दर्जा चांगला ठेवण्यासाठी खानावळीत वापरावयाच्या उपभोग्य वस्तू व पदार्थांबाबत सविस्तर तपशील खालील तक्त्याप्रमाणे असेल. सदर उपभोग्य वस्तू नमूद केलेल्या ब्रँड व्यतिरिक्त इतर ब्रँडच्या वापरल्याचे आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच सर्व भाज्या ताज्या, स्वच्छ व किटकमुक्त असणे आवश्यक राहील. सर्व भाज्यांचा साठा स्वच्छ व सुरक्षित पद्धतीने क्ररणे बंधनकारक असेल.

३.३ कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ. ची विल्हेवाट संस्थेच्या परिसराबाहेर स्वतः करणे आवश्यक राहील. कचऱ्याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच अन्न आणि कचऱ्यामुळे ड्रेनेज लाईन चोकअप होणार नाही याची काळजी घ्यावी व चोकअप झाल्यास त्याची दुरुस्ती कंत्राटदाराने स्वखर्चाने करावयाची आहे. खानावळ परिसर स्वच्छतेची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

३.४ खानावळीतील कर्मचारी यांच्या शारीरिक आरोग्य व स्वच्छतेचे कटाक्षाने पालन होणे अनिवार्य आहे. खानावळीतील कर्मचाऱ्यानी एप्रन, ग्लोव्हज, टोपी इत्यादी आवश्यक गणवेश वापरणे बंधनकारक असेल. तसेच कामगारांची दर तीन महिन्यांनी वैद्यकीय तपासणी झालेली असल्याचा पुरावा संस्थेच्या कार्यालयात सादर करावा लागेल. खानावळीत काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे शासन नियमानुसार करोना प्रतिबंधक लसींचे आवश्यक डोस घेतलेले असणे आवश्यक आहे व कोविड -१९ व इतर तत्सम

आजारांबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या किंवा केल्या जाणाऱ्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

३.५ खानावळीमध्ये मद्यपान/ धुम्रपान/ अमली पदार्थांचे सेवन व त्याची विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

३.६ खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थ्यांना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची विषबाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी खानावळ चालकावर राहील.

३.७ खानावळीतील भांडी, स्वयंपाक घरातील उपकरणे, फर्नीचर, वॉटर कुलर ची स्वच्छता करण्याची जबाबदारी हि कंत्राटदाराची आहे.

३.८ स्वयंपाकघर स्वच्छता सुनिच्छित करण्यासाठी सर्व शक्य उपाय करणे आवश्यक आहे. यामध्ये बेसिन वर हात धुण्यासाठी पुरेसा द्रव साबण, हात स्वच्छ करण्यासाठी स्वच्छ टॉवेल, सलाड, चपाती इत्यादी हताळण्यासाठी कामगारांना handgloves इत्यांदींचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

३.९ वॉश बेसिनवर हात धुणेसाठी द्रव साबण राखणे हि कंत्राटदाराची जबाबदारी आहे.

३.१० खानावळ कामगारांच्या स्वच्छतागृह/शौचालयात, साबण, टॉवेल इत्यादी तरतुदींसह स्वच्छतेची सर्वोच्च पातळी राखली पाहिजे.

३.११ कंत्राटदाराने नेहमीच जेवणाच्या जागेची स्वच्छता राखली पाहिजे. तसेच खाणावळीतील दुर्गंधी टाळण्यासाठी कंत्राटदाराने खानावळीच्या जेवणाच्या जागेचे, स्वयंपाक घराचे आणि हात धुण्याच्या जागेचे नियमितपणे स्वच्छतेबरोबर स्यानीटायझेशनकरणे अनिवार्य आहे.

३.१२ स्वयंपाकाचे क्षेत्र, जेवणाचे क्षेत्र आणि साठवणूक क्षेत्र येथे कमीतकमी दोन महिन्यांतून एकदा परवानाधारक एजन्सीमार्फत कीटकनियंत्रण करणे संबधित कंत्राटदाराची जबाबदारी असेल. तसे न केल्यास संस्थेमार्फत कीटक नियंत्रण करण्यात येईल व त्याचा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

३.१३ सदर मुलांच्या वसतिगृहातील खानावळीची निविदा प्रक्रिया हि वरिष्ठ कार्यालयाच्या मान्यतेस अधीन राहून करण्यात येत आहे.

## उपभोग्य वस्तूंच्या व पदार्थांच्या ब्रँड बाबत तक्ता

| अनुक्रमांक | उपभोग्य वस्तू व पदार्थ | ब्रँड |
|---|---|---|
| १ | मीठ | टाटा, अन्नपूर्णा, निसर्ग ताजा, आशिर्वाद, निरमा , सफोला, कॅप्टन कूक |
| २ | मसाले | एमडीएच, नॉर, कॅच, एव्हरेस्ट, मदर, निलॉन्स,एमटीआर, प्रिया, पतंजली,रामदेव,केप्र,प्रवीण,सुहाना. |
| ३ | तेल(सूर्यफूल) refined | सन ड्रॉप, गोदरेज, सफोला, फॉर्च्यून, जेमिनी, निसर्ग फ्रेश, धारा,(हायड्रोजनेटेड (वनस्पती) तेलाचा वापर प्रतिबंधित आहे.) |

| | | |
|---|---|---|
| ४ | लोणचे | मदर, प्रिया, टॉप, नीलॉन, एमटीआर, बेडेकर,प्रवीण |
| ५ | आटा | आशिर्वाद, पिल्सबरी, अन्नपूर्णा, सम्राट, निसर्ग ताजा, पतंजली, शक्तीभोग |
| ६ | पापड | लिज्जत, गणेश, श्रीजी, रामदेव, मदर |
| ७ | तूप | अमुल, मदर डेअरी, ब्रिटानिया, गिट्स, नेस्ले, एव्हरीडे, डायनॅमिक्स, वाडीलाल, वारणा, कात्रज,गोवर्धन |
| ८ | श्रीखंड | अमूल, वारणा,चितळे,कात्रज,गोवर्धन |
| ९ | पनीर | अमूल, मदर डेअरी, वारणा, गोवर्धन |
| १० | कोलम तांदूळ | रॉयल, डोनूर, कोहिनूर, इंडिया गेट |
| ११ | तुर डाळ / मसूर डाळ / उडीद डाळ / चणा डाळ | टाटा, इंडिया गेट, एमटीआर, मेट्रो (डीमार्ट / बिग बाजार / बिगबास्केटवरील पॅक केलेले साहित्य) |
| **** सर्व नॉन ब्रँडेड पदार्थ मेस कमिटीने ठरविल्याप्रमाणे राहतील . | | |

## ४. नियमांचे उल्लंघना बाबत दंड

नियमांचे उल्लंघन केल्यावर कंत्राटदारांना खालीलप्रमाणे दंड आकारला जाईल.

| अनुक्रमांक | नियम उल्लंघन | प्रति तक्रार किमान दंड (रु.) |
|---|---|---|
| १ | काउंटरवर तक्रार नोंदवही ची उपलब्धता नसल्यास | १०००/- |
| २ | a) जेवणामध्ये केस, रस्सी, प्लास्टिक, कापड , खडा किवा खडयासारख्या वस्तू आढळल्यास<br>b) अस्वच्छ भांड्याबाबत आठवड्यामध्ये तीन किंवा अधिक तक्रारी आल्यास<br>c) अन्न वेळेपूर्वी संपणे व पर्यायी व्यवस्था न करणे<br>d) परवानगीशिवाय जेवणांच्या मेनूमध्ये बदल<br>e) कामगारांकडून गैरवर्तन/त्यांच्या पोशाख आणि वैयक्तिक स्वच्छते बाबत तक्रार आल्यास.<br>f) कामगारांची तिमाही आरोग्य तपासणी न केल्यास | ५०००/- |
| ३ | काचेचे तुकडे, नखे , हार्डप्लॅस्टर सारख्या तीक्ष्ण वस्तू, जेवणामध्ये मध्ये आढल्यास | १००००/- |
| ४ | शिजवलेल्या अन्नात किडे (अळी) आढळल्यास | २५०००/- |
| ५ | विषबाधा | किमानरू. २ लाख किंवा त्याहून अधिक, शिवाय करार संपुष्टात येईल. दंड व/किवा पोलीस कार्यवाहीस पात्र राहील |

02-8-24

(डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे)

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)

Govt. College of Engineering and Research, Avsari Khurd, Tal. Ambegaon, Dist. (Pune)

(डॉ.दि.रा.पानगव्हाणे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय
अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे.

# मुलांच्या खानावळीसाठी मेनु कार्ड (२०२४-२५)

| | सकाळ (०९:०० ते ११:००) | | | | | संध्याकाळी (०७:०० ते ०९:००) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वार | सुकी भाजी | पातळ भाजी | भात | वरण | सॅलड | सुकी भाजी | पातळ भाजी | भात | वरण | सॅलड | गोड पदार्थ | Extras |
| रवि | वांग्याचं भरित/ टोमॅटो चटणी | बटाटा कोफ्ता /दुधीभोपळा कोफ्ता | मसाला भात | - | टोमॅटो, मुळा | मिक्स व्हेज/ दोडका | पिठलं /राजमा | भात | सांबर | कांदा, मोड आलेली मटकी | - | - |
| सोम | मेथी/ कारलं | राजमा/मासवडी | भात | मुग डाळ | १ फळ (Apple/ Banana) | बटाटा/गवार | पनीर / पालक पनीर | जीरा राईस | दाल तडका | कोशिंबिर (रायता) | गुलाब जामून/ शेवाई खीर | कांदा भजी |
| मंगळ | गवार/अख्खा मसूर | छोले/हुलगा | भात/ जीरा राईस | तूर डाळ | बीट, मुळा | पालक/ पालेभाजी ऋतुनुसार | हुलगा/ सोयाचंक | व्हेज बिर्याणी | - | गाजर, बीट | - | - |
| बुध | फ्लॉवर/छोले | बटाटा भाजी/ चवळी | भात | मुग डाळ | टोमॅटो, काकडी | हिरवे मुग | वाटाणा/ वाग्याची भाजी | भात | तूर डाळ | कांदा, बीट | - | - |
| गुरु | भेंडी / दोडका | मटकी भाजी | भात/ जीरा राईस | तूर डाळ | १ फळ (Apple, Banana) | पाव भाजी /मिसळ | - | पुलाव | - | कांदा, मोड आलेली मटकी | श्रीखंड/ गाजर हलवा | पोंगे/ आलू पकोडा |
| शुक्र | पालक / शेपू | अख्खा मसूर | मसाला भात | - | बीट, गाजर | बटाटा भाजी/पत्ता गोबी | मासवडी/ चवळी | भात | तूर डाळ | १ फळ (Apple, Banana) | - | - |
| शनि | वाटाणा | कढी | भात | मुग | मुळा, | मसाला | मसूर/शेवगा | व्हेज | - | बीट, | - | आळू वडी |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | +बटाटा भाजी | | | डाळ | काकडी | | भेंडी/ पालक /शेपू | | बिर्याणी | | कोशिंबिर (रायता) | | |

टीप:

१) जेवणात उच्च दर्जाच्या गव्हाची चपाती देणे व सर्व जेवण पोटभर देणे बंधनकारक राहील.

२) गोड पदार्थ चांगल्या दर्जाचे व शक्यतो बंद पॅकिंग मधील असावेत .

३) सर्व भाज्या व सलाड ताजे असावेत.

४) चपाती शक्यतो Machine Made तसेच गरम व ताजी असावेत.

५) सोमवार , बुधवार, शुक्रवार, रविवार–लोणचे (कैरी/लिंबू/मिक्स ) देणे आवश्यक राहील .

६) सोमवार ,बुधवार, शुक्रवार – एक पापड (उडीद/नाचणी) देणे आवश्यक राहील .

७) सोमवार ,बुधवार,शुक्रवार – चटणी (शेंगदाणा/खोबरे/जवस/कारळ/लसून) देणे आवश्यक राहील .

८) दररोज सकाळी १०० मिली ताक व सायंकाळी ५० ग्राम दही देणे आवश्यक राहील .

९) आठवड्यातून ३ वेळा जेवणानंतर (सकाळी किंवा सायंकाळी) एक फळ (केळी/पेरू/चिक्कू/आंबा/द्राक्षे(१०० ग्राम)/ पपई/फणस किंवा हंगामी फळ ) देणे बंधनकारक राहील.

१०) किमान ५० विद्यार्थ्यांनी पूर्व नोंदणी करून उपवासाच्या पदार्थाची मागणी केल्यास (साबुदाणा खिचडी/साबुदाणा वडी/भगर + दाण्याची आमटी )+०१ वाटी दही +०१ फळ (केळी/पेरू/चिक्कू/आंबा/द्राक्षे(१०० ग्राम) किंवा हंगामी फळ ) देणे बंधनकारक राहील.

११) प्रत्येक जेवणानंतर बडीसोप 'व साखर मिश्रित Mouth freshener देणे बंधनकारक राहील .

१२) प्रत्येक सणाच्या दिवशी (वर्षात सरासरी २० दिवस) जेवणा सोबत गोड पदार्थ देणे बंधनकारक राहील.

१३) सर्व टेबल वर salt / पेपर dispenser उपलब्ध असणे आवश्यक राहील.

## ६. निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

६.१ निविदाकाराचे नोंदविलेल्या धंद्याचे स्वरूप – केटरिंग सर्विसेस अथवा फूड बिझनेस अथवा फूड वेंडर अथवा खानावळ अथवा तत्सम असे असावे व ते महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम १९४८ अंतर्गत नोंदणी केलेले असावे. सदर नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर कमीत कमी एक महिन्यापर्यंत वैध असावे.

६.२ अन्न व औषध प्रशासन यांचेकडे केलेल्या नोंदीच्या दाखल्याची प्रत असावी व ती निविदा भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर कमीत कमी एक महिन्यापर्यंत वैध असावे.

६.३ निविदाकारास दि. ०१–०६–२०१८ नंतरच्या कालावधीत **राज्य / केंद्र शासनाच्या आस्थापनेवरील** किमान ०३ वर्षे कालावधीसाठी व किमान १५० व्यक्तींसाठी खानावळ/सेवा समाधानकारकरित्या चालवली असल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६.४. नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे अथवा संस्थेचे PAN Card असावे.

६.५ सेवा पुरवठादाराकडे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२३–२४ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी भरणा केल्याचे GSTR-1 व GSTR-3B उपलब्ध असणे आवश्यक आहे.

६.६ आर्थिक वर्ष २०२१–२२, २०२२–२३ व २०२३-२४ चे आयकर विवरण पत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत असणे आवश्यक आहे.

६.७ निविदाकाराची (त्याच्या आस्थापनेची) मागील तीन वर्षांची म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१–२२, २०२२–२३ व २०२३-२४ ची सरासरी वार्षिक उलाढाल कमीतकमी **रूपये ५० लक्ष** असणे. बंधनकारक आहे. निविदाकाराने त्यासंबंधी चार्टर्ड अकाउंटंट (CA) ने उलाढाल प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व त्या पुष्ट्यार्थ सहपत्रे आणि तसेच चार्टर्ड अकाउंटंट (CA) चे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (Registration Certificate) सादर करणे बंधनकारक आहे.

६.८ भागीदार करारनामा (Partnership Deed) ची प्रत अथवा भागीदार करारनामा नसल्यास निविदाकाराच्या लेटरहेडवर भागीदारी नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्राची प्रत. (वरील दोन कागदपत्रांपैकी एक कागदपत्र) जोडणे आवश्यक आहे.

६.९ निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे निविदाकाराचे स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञापत्र (affidevit) स्वसाक्षांकित करून सादर करावे लागेल

६.१० निविदाकाराने निविदा शुल्क रु. ५४००/– (ना परतावा) ऑनलाईन पद्धतीने ई – निविदा संकेतस्थळावर अदा केलेले असणे आवश्यक आहे .

६.१० निविदाकाराने बयाना रक्कम रु. ९००००/-- ऑनलाईनपद्धतीने अदा केलेले असणे आवश्यक आहे .

## ७.निविदा सादर करावयाची पद्धती

७.१ प्रत्येक निविदाकारास एकच निविदा भरता येईल.

७.२ निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर ई–निविदा पूर्व बैठक ( Pre bid meeting ) आयोजित करण्यात येईल. त्यास निविदाकाराने किवा अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहून शंका निरसन करून घ्यावे.

७.३ **तांत्रिक निविदा** – तांत्रिक निविदा ऑनलाईन पद्धतीने सादर करताना (संकेतस्थळावर अपलोड करताना) खालील कागदपत्रांचा समावेश असावा.

१) संस्थेच्या लेटरहेडवर सोबत दिलेले विवरणपत्र (प्रपत्र - अ )

२) संस्था संबंधित सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य / केंद्रशासनाच्या आवश्यकत्या विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र.

३) वैध Shop Act नोंदणी प्रमाणपत्र (नोंदविलेल्या धंद्याचे स्वरूप - केटरिंग सर्विसेस अथवा फूड बिझनेस अथवा फूड वेंडर अथवा खानावळ अथवा तत्सम असे असावे.)

४) संस्थेच्या संचालकाचे अथवा स्वतःचे नाव, कार्यालयीन पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल यांचे विवरण

५) नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे अथवा संस्थेचे PAN कार्ड

६) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी भरणा केल्याचे GSTR-1 व GSTR-3B

७) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र

८) आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ चे आयकर विवरण पत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत

९) निविदाकाराची (त्याच्या आस्थापनेची) मागील तीन वर्षांची म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ ची **सरासरी वार्षिक उलाढाल कमीतकमी रूपये ५० लक्ष** असल्याचे संबंधीत चार्टर्ड अकाउंटंट (CA) ने उलाढाल प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व त्या पुष्ट्यार्थ सहपत्रे आणि तसेच चार्टर्ड अकाउंटंट (CA) चे नोंदणी प्रमाणपत्राची (Registration Certificate) प्रत

१०) भागीदार करारनामा (Partnership Deed) ची प्रत अथवा भागीदार करारनामा नसल्यास निविदाकाराच्या लेटरहेडवर भागीदारी नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्राची प्रत. (वरील दोन कागदपत्रांपैकी एक कागदपत्र)

१०) यापूर्वी दि. ०१–०६–२०१८ नंतरच्या कालावधीचा **राज्य / केंद्र शासनाच्या आस्थापनेवरील** किमान **०३ वर्षे कालावधीसाठी** व किमान १५० व्यक्तींसाठी खानावळ/सेवा समाधानकारकरित्या चालवली असल्याच्या अनुभवाचे प्रमाणपत्र

११) निविदा शुल्क रु. ५४००/– ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची पावती

१२) बयाना रक्कम रु. ९००००/-ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची पावती

१३) निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे स्वसाक्षांकित हमीपत्र

वरील सर्व कागदपत्रे स्कॅन करून त्याची एकच pdf file करून https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी.

७.४ **वाणिज्यिक निविदा**– सोबत जोडलेल्या **प्रपत्र-ब** (BoQ नमुना) नुसार वाणिज्यिक निविदेत प्रति माह प्रति व्यक्ती रोज दोन वेळेच्या जेवणासाठी आकारण्यात येणारा दर (सर्व प्रकारच्या करासहित) (Rate inclusive of all taxes per person per month for 2 meals every day) तसेच एका वेळेच्या जेवणासाठी गेस्ट चार्जेस (सर्व प्रकारच्या करासहित) (Guest charges inclusive of all taxes per meal) असे दोन्ही दर (सर्व प्रकारच्या करासहित) सुस्पष्टपणे रुपयात वेगवेगळे नमूद करणे आवश्यक राहील.

## ८. निविदा उघडण्याची कार्यपद्धती

८.१ नमूद करण्यात आलेल्या तारखेस सदर संकेतस्थळावर सादर झालेल्या निविदा उघडण्यात येतील व समितीद्वारे त्याचं तांत्रिक छाननी करण्यात येईल.

८.२ तांत्रिक छाननी दरम्यान निविदाकाराने स्कॅन करून अपलोड केलेली सर्व प्रमाणपत्रे व वैधता तपासण्यात येईल.

८.३ पात्र निविदाकारांची यादी संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल .

८.४ तांत्रिक छाननीअंती पात्र असलेल्या निविदाकाराच्या वाणिज्यिक निविदा उघडण्यात येतील.

८.५ वाणिज्यिक निविदेत प्रति माह प्रति व्यक्ती रोज दोन वेळेच्या जेवणासाठी आकारण्यात येणार दर (सर्व प्रकारच्या करासहित) (Rate inclusive of all taxes per person per month for 2 meals every day) तसेच एका वेळेच्या जेवणासाठी गेस्ट चार्जेस (सर्व प्रकारच्या करासहित)(Guest charges inclusive of all taxes per meal) असे दोन्ही दर (सर्व प्रकारच्या करासहित) सुस्पष्ठपणे नमूद केलेले नसल्यास निविदा फेटाळण्यात येईल.

८.६ दोन किवा अधिक निविदाकारांच्या एकूण दरामध्ये समानता असल्यास ज्या निविदाकारास राज्य शासन/ केंद्र शासन यांना सेवा समाधानकारकरित्या पुरविण्याचा दि. ०१/०६/२०१८ नंतरच्या कालावधीचा जास्त अनुभव असेल त्यास प्राधान्य देण्यात येईल .

## ९. कार्यादेश देण्याची कार्यपद्धती

९.१ वाणिज्यिक निविदेत **प्रति माह प्रति व्यक्ती रोज दोन वेळेच्या जेवणासाठी आकारण्यात येणार दर (सर्व प्रकारच्या करासहित) (Rate inclusive of all taxes per person per month for 2 meals every day) व एका वेळेच्या जेवणासाठी गेस्ट चार्जेस(सर्व प्रकारच्या करासहित) (Guest charges inclusive of all taxes per meal) असे दोन्ही मिळून न्यूनतम दर (सर्व प्रकारच्या करासहित) प्रस्तावित केलेल्या पात्र कंत्राटदारास कार्यादेश देण्यात येईल.**

९.२ ज्या निविदाकाराची निविदा स्वीकृत होईल त्यांनी नोटरीसमोर रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा सादर केल्यावर ११ महिन्यांचे कंत्राट अस्तित्वात येईल.

९.३ वरील अनुक्रम ९.२ ची पूर्तता केल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल. त्यानंतर ७ दिवसाच्या आत रु. २,००,०००/- (रुपये दोन लाख) इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँक ग्यारंटी रुपात महाविद्यालयात जमा करावी लागेल.

९.४ सेवा पुरवठादाराने ११ महिन्याचा करार संपण्यापूर्वी एक महिना पूर्वसूचना न देता सेवा बंद केल्यास **अथवा** करार संपण्यापूर्वी करारातून मधेच बाहेर पडायचे असल्यास त्यावेळी तीन महिन्यांची पूर्वसूचना न देता सेवा बंद केल्यास सुरक्षा रक्कम जप्त करून शासनास जमा करण्यात येईल. तसेच ११ महिन्याचा करार संपल्यानंतर आणि सेवा पुरवठादार करार पुढे ११ महिने वाढून मिळण्यास पत्र असेल परंतु पुरवठादार ११ महिने करार वाढून घेण्यास असहमत असेल तर अशा वेळेस पुढच्या कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यन्त त्यास आहे त्याच दराने व करारातील आटी व शर्ती नुसार खानावळ चालवणे बंधनकारक असेल.

**<u>पुरवठादाराने यापूर्वी संस्थेमध्ये दिलेली सेवा असमाधानकारक असल्यास किवा करारानुसार सेवाकाळ पूर्ण न करता सेवा मधेच खंडित केलेली असल्यास त्यांनी निविदा सादर करू नये. अशा निविदाकारास पुढील दोन शैक्षणिक वर्ष या संस्थेत निविदा सादर करण्यास प्रतिबंध असेल. अशा पुरवठादराने निविदा सादर केल्यास ती बाद ठरविण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.</u>**

02-8-21

डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय
अवसरी (खुर्द)

(डॉ. दि.रा. पानगव्हाणे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय
अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे.

Govt.College of Engineering and Research, Avasari Khurd, Tal.Ambegaon, Dist.(Pune)

## प्रपत्र- अ (तांत्रिक निविदा) (Proforma for the Technical Bid)

## (संस्थेच्या लेटरहेडवर)

निविदाकाराने स्वतःच्या लेटरहेडवर खालील नमुन्यात सर्व आवश्यक भरून सही/शिक्का करून pdf format मध्ये www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावा. त्यासोबत या निविदा सूचनेमध्ये मागणी केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्रांच्या प्रति स्कॅन करून त्या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण निविदा किवा कंत्राटदाराची स्वाक्षरी नसलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. तांत्रिक निविदांमध्ये पात्र ठरणाऱ्या निविदाकारांची यादी या महाविद्यालयाच्या संकेत स्थळ www.gcoeara.ac.in येथे देखील दिनांक **१९/०८/२०२४** रोजी सायंकाळी **५.३०** वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. तांत्रिक निविदामधून पात्र ठरलेल्या निविदाकारांच्या वाणिज्यिक निविदा दिनांक **२१/०८/२०२४** रोजी सकाळी **११.००** वाजता निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात येईल.

### तांत्रिक निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे

| अनु. क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | निविदाकाराच्या लेटरहेड वर निविदाकाराचा ई मेल, दूरध्वनी क्रमांक, सही व शिक्का असलेले स्वतःचे किवा संस्थेची माहिती असलेले विवरण पत्र | होय / नही |
| २ | दि. ०१/०६/२०१८ पासून पुढील कालावधीत राज्य / केंद्र शासनाच्या आस्थापनेवरील, किमान ०३ वर्षे कालावधीसाठी व किमान १५० व्यक्तींसाठी खानावळ/ सेवा समाधानकारकरित्या चालवली असल्याचे सबंधित आस्थापनेने दिलेले अनुभव प्रमाणपत्राची प्रत | होय / नही |
| ३ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम १९४८ अंतर्गत नोंदणीच्या दाखल्याची प्रत व अद्यावत नूतनीकरणाच्या दाखल्याची प्रत (नोंदविलेल्या धंद्याचे स्वरूप – केटरिंग सर्विसेस अथवा फूड बिझनेस अथवा फूड वेंडर अथवा खानावळ अथवा तत्सम असे असावे). | होय / नही |
| ४ | अन्न व औषध प्रशासन यांचेकडे केलेल्या नोंदीच्या दाखल्याची प्रत | होय / नही |
| ५ | जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत व आर्थिक वर्ष २०२३–२४ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी रिटर्न्स सादर केल्याच्या पुराव्याची प्रत (Form GSTR-1 व GSTR-3B) | होय / नही |
| ६ | PAN कार्ड ची प्रत | होय / नही |

| | | |
|---|---|---|
| ७ | आर्थिक वर्ष २०२१–२२, २०२२–२३ व २०२३-२४ चे आयकर विवरण पत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत | होय / नही |
| ८ | निविदाकाराची (त्याच्या आस्थापनेची) मागील तीन वर्षांची म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१–२२, २०२२–२३ व २०२३-२४ ची सरासरी वार्षिक उलाढाल कमीतकमी **रूपये ५० लक्ष** असल्याचे संबंधीत चार्टर्ड अकाउंटंट (CA) ने उलाढाल प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व त्या पुष्ट्यार्थ सहपत्रे<br><br>संबंधित चार्टर्ड अकाउंटंट (CA) चे नोंदणी प्रमाणपत्राची (Registration Certificate) प्रत | होय / नही<br><br>होय / नही |
| ९ | भागीदार करारनामा (Partnership Deed) ची प्रत **अथवा**<br>भागीदार करारनामा नसल्यास निविदाकाराच्या लेटरहेडवर भागीदारी नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्राची प्रत.<br>**(वरील दोन कागदपत्रांपैकी एक कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.)** | होय / नही |
| १० | निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे निविदाकाराचे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र (affidevit) स्वसाक्षांकित करून जोडावे. | होय / नही |
| ११ | निविदा शुल्क रु. ५४००/– ऑनलाईन पद्धतीने भरल्याच्या पावतीची प्रत | होय / नही |
| १२ | बयाना रक्कम रु. ९००००/– ऑनलाईन पद्धतीने भरल्याच्या पावतीची प्रत | होय / नही |

मी खालील सही करणारा शपथपूर्वक असे प्रमाणित करतो/ करते की वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी असून त्यात कोणतीही माहिती खोटी आढळ्यास होणाऱ्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी हि माझी राहील. तसेच सदर कंत्राटासाठी नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

स्थळ : सही :

दिनांक : नाव :

## प्रपत्र- ब (वाणिज्यिक निविदा) (Proforma for the Commercial Technical Bid)(BoQ)

**निविदाकाराने https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरिल सदर निविदेतील वाणिज्यिक निविदे मधील (Financial Bid ) BoQ file मध्ये Name of the Bidder/Bidding Firm/Company अचूक नमूद करावी व त्याच BoQ file मध्ये मुद्दा क्र. ७.४ नुसार दर (सर्व करांसहित ) अचूक भरावेत.**

**Item Rate BoQ**

**Tender Inviting Authority: Principal, Government College of Engineering and Research, Avasari Khurd**

**Name of Work: Boys Hostel Mess Contract**

**Contract No: GCOEARA/BOYS HOSTEL/2024/2178 Dated 02 August 2024**

| | |
|---|---|
| **Name of the Bidder/ Bidding Firm / Company :** | |

**PRICE SCHEDULE**

**(This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevent columns, else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name and Values only )**

| NUMBER # | TEXT # | NUMBER # | TEXT # | NUMBER | NUMBER # | NUMBER # | TEXT # |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Item Description | Quantity | Units | Estimated Rate in Rs. P | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder in | TOTAL AMOUNT with all Taxes in | TOTAL AMOUNT In Words |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 13 | 53 | 55 |
| 1 | **Mess Contract Services to be provided** | | | | | | |
| 1.01 | Rate per person per month for two meals everyday (inclusive of all taxes) | 1 | Person | 1.00 | | **0.00** | INR Zero Only |
| 1.02 | Guest Charges per meal (inclusive of all taxes) | 1 | Person | 1.00 | | **0.00** | INR Zero Only |
| **Total in Figures** | | | | | | **0.00** | INR Zero Only |
| **Quoted Rate in Words** | | **INR Zero Only** | | | | | |